जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

सोमवार दि.७ ऑक्टोबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ३४

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## राहुल गांधींनी आधी नेहरुंच्या पुस्तकाबद्दल माफी मागावी

# नंतरच त्यांना महाराजांविषयी बोलण्याचा अधिकार-देवेंद्र फडणवीसांचे प्रत्युत्तर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ठाणे (वृत्तसंस्था)**

राहुल गांधी यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर बोलण्याचा अधिकार नाही. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या पुस्तकाबद्दल आधी त्यांनी माफी मागावी आणि त्यानंतरच शिवाजी महाराजांबद्दल बोलावे, असे आव्हान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राहुल गांधी आज महाराष्ट्र दौऱ्यावर असताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युती सरकारवर टीका केली होती. याला देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

ठाण्यात सुमारे ३२,८०० कोटींच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी मोदींच्या हस्ते करण्यात आली. यात मुंबई मेट्रो लाइन ३ फेज १ च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या टप्प्याचे उद्घाटन देखील झाले आहे. ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पांचीही पायाभरणी मोदींच्या हस्ते झाली. या कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांचा समाचार घेतला आहे.

या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. राहुल गांधींनी आधी सर्व शिवप्रेमींची माफी मागावी आणि त्यानंतरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी बोलावे, असे आव्हान त्यांनी दिले. राहुल गांधी महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांविषयी बोलू शकत नसल्याचे ते म्हणाले. राहुल गांधी यांच्या हस्ते कोल्हापूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे लोकार्पण आज सकाळी झाले. या कार्यक्रमात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. याला देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

सध्या देशात २ विचारधारांची लढाई आहे. एक विचारधारा छत्रपती शिवाजी महाराजांची आहे, तर दुसरी विधारधारा संविधान संपवणारी आहे. याच विचारधारने शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला विरोध केला होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणाऱ्यांनी संविधानाचा सन्मान केलाच पाहिजे, असे म्हणत राहुल गांधी यांनी युतीवर निशाणा साधला होता. कुणाचीही नियत केव्हाही लपत नाही. त्यांनी शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आणि काही दिवसांतच तो पुतळा पडला. त्यांचा हेतू चुकीचा होता. त्यामुळे पुतळ्याने त्यांना संदेश दिला की, तुम्ही शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार असाल तर तुम्हाला त्यांच्या विचारांचे संरक्षण करावेच लागेल. यामुळेच तो पुतळा पडला. कारण, त्यांची विचारधारा चुकीची आहे. ते समोरून येऊन हात जोडतात आणि नंतर २४ तास त्यांच्या विचारधारेविरोधात काम करतात, असा आरोप राहुल गांधी यांनी केला होता.



# सौ.साधना मारमवार यांना गूरू गौरव पूरस्काराने सन्मानीत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालूक्यातील डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श जिल्हा परिषद शाळा अटकळी येथील सहशिक्षिका सौ. साधना मारमवार यांना गूरूगौरव पूरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

४ आक्टोबर रोजी नांदेड येथील सभागृहात जिल्हास्तरीय गूरू गौरव पूरस्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्यात शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यात योगदान असलेल्या शिक्षकांचा गूरु गौरव पुरस्काराची निवड करण्यात आली यात अटकळी डॉ बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद शाळा येथील सहशिक्षिका साधनाताई मारमवार यांना पूरस्कारर प्रधान करण्यात आला



यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी माधव सलगर प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी सविता बिर्गे यावेळी उपस्थित होते या पुरस्काराने सन्मानीत झाल्यामूळे बिलोली चे गटशिक्षणाधिकारी पाटील व शाळेतील शिक्षक वृंद सर्व सहकारी यांनी सौ. साधनाताई मारमवार यांचं अभिनंदन केले.

# पुरोगामी पत्रकार संघ संलग्न तालुका दिव्यांग सेल ची कार्यकारीणी जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोलसावंत**



०६/१०/२०२४ रोजी पुरोगामी पत्रकार संघ सलग्न दिव्यांग सेल ची कार्यकारीणी शासकीय विश्राम ग्रह केज येथे ठिक सकाळी ११:३ वाजता पुरोगामी पत्रकार संघाचे राज्य प्रसिध्दी प्रमुख श्री. दत्तात्रय मुजमुले यांच्या आध्यक्षतेखाली निवड करून नियुक्तीपत्र देण्यात आले.यावेळी राष्ट्रीय अपंग विकास महसंघ राज्य संचालक श्री .विनायकरावजी लोंढे सर, पुरोगामी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष (जेष्ठ पत्रकार)श्री.मनोराम बाबुराव पवार, प्रहार संघटनेचे श्री.महादेव डोईफोडे व बहुसंख्य दिव्यांग बांधवा च्या उपस्थीतित कार्यक्रम पार पडला.संघटना म्हणजे एकाच विचाराने प्रेरीत होउन एकाच उद्धेशासाठी लढणारे लोक एकत्र येऊन जो गट तयार होतो त्याला संघटना असे म्हणतात .अनुकुल परिस्थीतित शंभर डोकी म्हणजे संघटना नाही तर प्रतिकुल परिस्थीतित साथ देणारे काही मोजके सहकारी म्हणजे संघटना हा विचार दिव्यांग बांधवांनी आत्मसात केला. श्री .दत्तात्रय मुजमुले यांनी कार्यकारीणश जाहीर केली ती अशी, केज दिव्यांग सेल तालुका अध्यक्ष,श्री.अमोल किसन सावंत,उपाध्यक्ष,सुरेश गोरे ,उपाध्यक्ष ,सुखदेव कापरे, सहसचिव,वसुदेव सारुक ,संघटक ,अशोक शिंदे, सहसंघटक ,आसाराम घुले,शहराध्यक्ष,शिवराम घुले ,सदस्य विकास घोडके ,थोरात प्रल्हाद,गायकवाड महादेव,कसबे शिवाजी,बिक्कड फुलचंद,शिंदे भगवान,क्षीरसागर गोकुळ,तांदळे अशोक, सुरेश गदळे, दिलीप वाघमारे ,सदस्या दिक्षा वाघमारे ,मदिना शेख ,स्वर्णमाला शिंदे यांची निवड करण्यात आली.

# गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल चे शिक्षक सैय्यद सलमान सरांना 'उत्कृष्ट शिक्षक २०२४' पुरस्कार मिळाला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुसद । सय्यद रहीम रजा**



शनिवार मुंबई येथे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना उर्दू खाजगी शिक्षक संघ तसेच मुंबई मुंसीपल को-ऑरपरेशन यांच्या तर्फे या वर्षी २०२४ चा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यात आला. यात यवतमाळ जिल्हयातील पुसद मधील मा.सैय्यद सलमान सर यांचे उल्लेखनीय शैक्षणीक कार्य अवघ्या महाराष्ट्रात सर्व समाजाच्या मुलांना मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी भाषे करिता ऑनलाईन व ऑफलाईन विविध उपक्रम तसेच पोलीस भरती सारख्या परीक्षेचे ऑनलाईन मार्गदर्शन तसेच देशात राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी सामाजिक ऐक्य या विषयावर अनेक ठिकाणी संशोधन पेपर व लेख अनेक वृत्तपत्रात मराठीत प्रतुस्त करणे तसेच स्वतः मराठी सारख्या अवघड समजल्या जाणाऱ्या विषयात संत साहित्यात सर पि.एच. डी करीत आहे. तसेच प्रेषितांचे चरित्र मराठीत सर्व समाजाला कळावे यासाठी आकाशवाणी केंद्रात मराठीत प्रबोधन तसेच छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर मराठीत अनेक ठिकाणी व्याख्याने ही सर्व सामजिक आणि शैक्षणिक कामे सैय्यद सलमान सर सुट्टीच्या दिवशी आपला वेळ काढून करीत असतात.

अश्या या त्यांच्या शैक्षणीक कार्यासाठी या भव्य दिव्य पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे माननीय मुश्ताक अंतुले साहेब चेअरमन महाराष्ट्र राज्य अल्पंख्याक आर्थिक महामंडळ राज्य मंत्री दर्जा यांच्या हस्ते सैय्यद सलमान सरांना २०२४ चा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.विशेष म्हणजे या पुरस्कारा मध्ये आलेल्या शिक्षकां पैकी सर्वात कमी वय असलेले एकमेव शिक्षक म्हणजे सैय्यद सलमान सर होते.हा पुरस्कार मिळाल्या नंतर सर्वीकडे आनंद व्यक्त जातो.



## झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

दुसऱ्याचं दुःखही
तुला न सांगता कळायला हवं
आसवांची भाषा जाणूनी
फुंकर घालत मिळेल समाधान नवं.

रंजना सानप
मायणी (सातारा)



कौठा येथे आगामी निवडणूकीच्या निमित्ताने ई.व्ही.एम. मशीन व्दारे मतदान प्रात्यक्षिक दाखवतांना कौठयाच्या तलाठी पूजाराणी कुंटूरकर मॅडम तलाठी बारूळ विष्णू मुंडे तलाठी काटकळंबा सलीम काझी मास्टर ट्रेनर पवन तायडे सह मतदार उपस्थित होते.



# भुलभुलैय्या

लोकनेता न्यूज नेटवर्क

हा तुझा भुलभुलैय्या
कळतोय रे आम्हाला !
आटापिटा तुझा हा
कळतोय रे आम्हाला !!

हातात संविधानं
बातांत राज्यघटना !
पण जाळ मनातील तो
कळतोय रे आम्हाला !!

पथनाट्य विवेकाचे
दाविती किती कोणी !
पण दिखावा तयातील
कळतोय रे आम्हाला !!

वल्गना मुखाच्या त्या
करशील जिथे कुठे तू !
पण फोलपणा त्यांचा
कळतोय रे आम्हाला !!

सलतेय किती कोठे
ते बोट दिशादर्शक !
डोळा आणि धनी तो
कळतोय रे आम्हाला !!

त्या न्याय मंदिराच्या
दारासि किती गर्दी !
लाटतो कोण वर्दी
कळतोय रे आम्हाला !!

लोकांची लोकशाही
पण बटिक कशी वाटे !
अन् दंड कुणा हाती
कळतोय रे आम्हाला !!

रक्षांत मनूसाठी
आतूर कोण येथे !
घेतोय कोण खेटे
कळतोय रे आम्हाला !!

किती उपनशील मित्रा
वादे नि भाषणे तू !
पण फुपाटाच सारा
कळतोय रे आम्हाला !!

किती उधळली फुले तू
बुलडोझरामधूनी !
आक्रोश तेथीलांचा
कळतोय रे आम्हाला !!

उध्वस्त जाहलेल्या
अबलांनी फोडलेला !
टाहो न कळे तुज पण
कळतोय रे आम्हाला !!

बस् बंद कर आता ते
तुणतुणे तुझे तू !
जलसा तुझा आभासी
कळतोय रे आम्हाला !!



– डॉ. विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.....


# राहुल गांधींच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण दुर्दैवी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या हस्ते कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण झाले. यावरून भाजप तसेच शिवसेना शिंदे गटाने टीका केली आहे. भाजप पक्षातर्फे कोल्हापुरात ठिय्या आंदोलन करण्यात आले. तर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार संजय शिरसाट यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

शिवसेना आमदार संजय शिरसाट म्हणाले. राहुल गांधी यांना छत्रपती शिवाजी महाराज म्हणायला लाज वाटते आणि काँग्रेसच्या लाचार लोकांनी त्यांच्याच हस्ते छत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण केले, हे दुर्दैवी आहे. आमच्या महाराजांचे नाव अभिमानाने आणि स्वाभिमानाने घेतले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज असे नाव उच्चारले पाहिजे, असे संजय शिरसाट म्हणाले. पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, यापूर्वी देखील राहुल गांधींना महाराजांचा पुतळा देण्यात आला होता. तो त्यांनी एका हाताने उचलला होता. आज त्यांच्याच हस्ते महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले हे दुर्दैवी आहे. लाचार महाविकास आघाडीला गांधी यांचे पाय चेपावे लागतात, अशी टीका देखील संजय शिरसाट यांनी केली. तसेच या लाचारांनी हिंदुत्वाचे नाव देखील घेऊ नये, असे ते म्हणाले. दरम्यान, राहुल गांधी यांनी देखील भाजपवर टीका केली आहे. कोल्हापूर येथे बोलताना राहुल गांधी म्हणाले, भाजप शिवाजी महाराजांची विचारधारा मानत नाही. हे लोक २४ तास विचारधारेच्या विरोधात काम करत असतात. आमचा लढा संविधान वाचवण्यासाठी आहे. विचारधारेचा लढा आहे. शिवाजी महाराजांनी आयुष्यभर अन्यायाविरोधात न्यायची लढाई केली आणि सत्याच्या मार्गावर चालण्याची शिकवण दिली. आम्ही देखील त्यांच्याच मार्गावर चालत आहोत. लोकांच्या न्याया हक्कासाठी लढत राहणार, असे राहुल गांधी म्हणाले.



आज मा.श्री. गणेशजी खाडे विचारवंत, साहित्यिक, लेखक तथा अध्यात्मिक मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ, महाराष्ट्र राज्य हे वैयक्तिक कामानिमित्त देऊळगाव राजा येथे आले असता मित्र किरण जायभाये व माझी भेट झाली. आपली आपुलकीची माणसं आपल्या गावाला आली तर ती निदान चार पाच दिवस जाऊ नाही हा आपल्या मनातील भाव असतो.. म्हणजे म्हणजे विचारांची देवाण घेवाण सहज होते. मागील काही वर्षा पासून वंजारी महसंघा सोबत काम करत असतांना अनेक थोर माणसं मिळत गेली. परंतु या सर्वांच्या मागील महत्वाचे पात्र म्हणजे खाडे सर २००१ पासून सुरू केलेल्या संगटणाला अजून कुठेही तडा गेला नाही आणि जाणार देखील नाही यावर आम्ही ठाम आहोत. इतकेच. परंतु काही बाबी अशा आहेत, त्यातील एक म्हणजआपले पाहुणे आपला निरोप घेऊ पर्यंत आपण त्यांच्या सोबत थांबायचं असतं म्हणजे सर्वांच्या मनाला समाधान वाटत.. (छाया :– . लोकनेता न्युज नेटवर्क देऊळगाव राजा)

# भविष्यात प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचे महत्व वाढणार–एस.एम.देशमुख

## चुकीला चूक म्हणण्याची भूमिका पत्रकारांनी ठेवावी–बदामराव पंडित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

समाजात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टी आणि राज्यकर्त्यांच्या विरोधात लोकहितासाठी भूमिका मांडण्याचे काम पत्रकारांचे आहे यासाठी प्रिंट मीडिया जितका महत्त्वाचा आहे तितकाच महत्त्वाचा भविष्यात डिजिटल मीडिया असणार आहे.त्यामुळे पत्रकारांनी डिजिटल मीडियामध्ये अधिक सक्रिय व्हावे असे आवाहन अभा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी केले आहे.सत्ताधाऱ्यांचे चुकत असेल तर ते चूक म्हणण्याची भूमिका पत्रकारांनी ठेवावी आणि जनतेचा आवाज होऊन प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडियाने काम करावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.



गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी अभा मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सदस्यांचा मेळावा आणि नूतन पदाधिकारी सत्कार सोहळ्याची आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी कार्यक्रमा अध्यक्ष म्हणून एस एम देशमुख बोलत होते.या कार्यक्रमास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, संपादक सर्वोत्तम गावस्कर, राज्य सरकारच्या अधिस्वीकृती समितीचे सदस्य अनिल महाजन,डिजिटल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर,डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले,मराठा पत्रकार परिषद जिल्हा सचिव राजेंद्र बरकसे,जिल्हाउपाध्यक्ष जुनेद बागवान यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनिल वाघमारे यांचा उपस्थित मान्यवर आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तर डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दिनकर शिंदे यांची निवड जाहीर करून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना एस एम देशमुख म्हणाले की,काळ बदलत आहे तशा पद्धतीने पत्रकारांनीही आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे.आजच इलेक्ट्रॉनिक मीडियाने आपले स्वतंत्र यूट्यूब चैनल सुरू केले आहेत तर काही दैनिक आणि पत्रकार यांनी सुद्धा आपले युट्युब चॅनल सुरू केले आहेत. भविष्यात प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचे महत्त्व अधिक वाढणार आहे.त्यामुळे या क्षेत्रात टिकायचे असेल तर पत्रकारांनी डिजिटल मीडियामध्ये सहभागी होऊन सक्रियपणे काम करावे.विविध न्यूज चैनल आणि वर्तमानपत्रे आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सरकार नेहमीच प्रयत्न करत आहे त्यासोबतच आता डिजिटल मीडिया ही आपल्याच ताब्यात राहावा यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत.ते आम्हाला मान्य नाही म्हणूनच मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषद याचा तीव्र विरोध करत आहे. राज्यातले सरकार स्वतःच्या राजकीय हितासाठी नको त्या योजना जाहीर करून तिजोरीतील पैसा कमी करून कर्जबाजारी होत आहे.याबाबत पत्रकारांनी आवाज उठवण्याची गरज आहे.मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद राज्यातल्या ३६ जिल्ह्यांमध्ये पोहोचले असून,प्रत्येक तालुक्यापर्यंत या संघटनेचे सदस्य उभा राहिले आहेत.ही आपली जमेची बाजू असून येणाऱ्या काळात डिजिटल मीडियाच्या माध्यमातून नवी क्रांती करण्यासाठी या पत्रकारांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे,मात्र आजही काही संपादकांना ही वस्तुस्थिती मान्य होत नाही.जेव्हा त्यांना यातील खरी स्थिती माहिती होईल तेव्हा खूप उशीर झालेला असेल असेही ते म्हणाले.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की,पत्रकार हा समाज आणि सत्ताधाऱ्यांना त्यांचा खरा चेहरा दाखवणारा आरसा आहे.कोणी चांगलं काम करत असेल तर त्याला चांगले म्हटले पाहिजे परंतु चुकीचे काम करत असेल तर ते चूक मांडण्याची भूमिका सुद्धा पत्रकारांनी घेतली पाहिजे.आज राज्यातल्या सरकारने आर्थिक उधळपट्टी सुरू केली आहे.मात्र दुसरीकडे महागाई,बेरोजगारी वाढल्याने गरिबांना जीवन जगणे मुश्किल झाले आहे.राज्य सरकारच्या विरोधात सामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष आहे, खदखद आहे,ती पत्रकार बांधवांनी आपल्या प्रिंट आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून जगासमोर आणावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की,एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आणि देशात मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून जागरूक पत्रकारांची एक मोठी फळी निर्माण झालेली आहे.म्हणूनच पत्रकारांना पेन्शन आणि संरक्षण कायदा सरकारला मंजूर करावा लागला आहे.या पुढच्या काळात स्वाभिमानाने खंबीरपणे पत्रकारांना काम करता यावे यासाठी डिजिटल मीडिया परिषद सक्रियपणे राज्यभर काम करणार आहे.संघटना वाढवून पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या पत्रकारांची संघटनेला गरज आहे.त्यामुळे पत्रकारांनी ग्रामीण भागातही एकजुटीने खांद्याला खांदा लावून काम करावे असे आवाहन केले.

याप्रसंगी कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार आयुब बागवान,सुभाष सुतार,गणेश क्षिरसागर,सुभाष शिंदे,सोमनाथ मोटे,संपादक सुनील पोपळे,शेख जावेद,प्रसाद कुलकर्णी,शेख खाजा,गजानन चौकटे,शेख इर्शाद,नवनाथ काळे,ओम साबळे या पत्रकारांसह एकनाथ लाड, नारायण झेंडेकर,संतोष कोटेकर,गणेश माने,सचिन पुणेकर,अनिल गंगणे आदींसह बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेचे सदस्य पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर शिंदे,सूत्रसंचालन सुभाष शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन सोमनाथ मोटे यांनी केले.

# सकल गरजवंतांचे लोकप्रतिनिधी विधानभवनात पाठवल्यास आरक्षण मिळेल–सुरेश पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

गेले चाळीस वर्षे मराठा आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या मातीत गाजत आहे. परंतु श्रीमंत मराठा लोकप्रतिनिधी या प्रश्नाला सोईस्कर बाजूला ठेवून सत्ता उभोगतात.म्हणजेच आरक्षणाचा प्रश्न फक्त सत्ता मिळवण्यासाठी केला जातो की काय असा प्रश्न हा सर्वसामान्य गरजवंत समाज सत्ताधाऱ्यांना विचारत आहे.गेले वर्षापासुन मराठा योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांनी गरजवंत मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करत आहेत. परंतु त्यांच्या आंदोलनाला प्रस्तापित श्रीमंत मराठा मोडीत काढत असल्याचे चित्र दिसत आहे. श्रीमंत मराठाच जर मराठा आरक्षणाला विरोध करत असेल तर गरजवंत मराठ्यांना आरक्षण मिळेल का नाही याची शंका मनात आल्याशिवाय राहत नाही. यासाठी विधानमंडळात जास्तीत जास्त गरजवंत लोकप्रतिनिधी असल्याशिवाय मराठा,मुस्लिम, धनगर आरक्षणांचा प्रश्न सुटणार नाही.आगामी निवडणुकीत जास्तीत-जास्त गरीब आणि संविधानतज्ञ लोकप्रतिनिधी पाठवणे गरजेचं आहे.तरच आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो. असे मत शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.




लोकशाहीमध्ये प्रत्येकाला योग्य पद्धतीने जीवन जगण्याचा आणि जीवनामध्ये काळानुरूप बदल झाल्यास हक्क मिळवण्याचा अधिकार असतो. परंतु ज्यांना लोकशाही समजलेले नाही.तेच- ते राजेशाही प्रमाणे लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात.त्यामुळे वाढती महागाई,बेरोजगारी न समजल्याने ते त्या प्रश्नांची जाणीव राहत नाही.तो प्रश्न त्यांना महत्वाचा वाटत नसल्याचे सोयीस्कर दुर्लक्ष करतात.असे सामाजिक प्रश्न सर्व जाती धर्माच्या लोकांना अडचणीचे वाटतात.त्यासाठी जातीभेद व धर्मभेद न करता संविधान तज्ञ लोकप्रतिनधींना विधान भवनात पाठवणे आवश्यक आहे.परंतु जातिभेदाचा सडका मेंदु डोक्यात असणारे लोकप्रतिनिधी समाजा-समाजामध्ये भांडण लावून तो प्रश्न तेवत ठेवण्याचे काम करतात आणि राजकारणातील महत्त्वाची पदे उपभोगतात.इंग्रजांची नीती अवलंबून स्वतः सत्तेत पुन्हा-पुन्हा येतात.जनतेचे प्रश्न तसेच राहतात.ते कधीही सुटत नाहीत.साडेचार वर्षे सत्तेची चावी ताब्यात ठेवून फक्त सहा महिने असे सामाजिक प्रश्न उपस्थित करून निवडणुकीच्या तोंडावर समाजामध्ये फूट पाडून मताची विभागणी करून आपल्या पक्षांच्या पदरात सामाजिक समीकरणातून लोकप्रतिनिधी निवडून आणतात.आणि सत्ता ताब्यात घेऊन येरे माझ्या मागल्या ! अशी अवस्था राजकारणात करतात. त्यामुळे सर्व मतदारांनी जातिभेद धर्मभेद न करता सर्वसामान्य लोकप्रतिनिधी विधानभवनात पाठवले तर आरक्षणासारखे प्रश्न सुटू शकतात.असेही मत सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## भाजपचे उद्या महाजनसंपर्क अभियान

# नितीन गडकरी,फडणवीसांसह ३२ हजार कार्यकर्ते मैदानात





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

लोकसभेच्या निवडणुकीत घटलेल्या मतदानाचा आणि मताधिक्याच्या टक्केवारीने भाजपने चांगलीच धास्ती घेतली आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी भाजपने कार्यक्रमांचा धडाका लावला आहे. रोज भूमिपूजन, उद्घाटनाचे कार्यक्रम होत असताना आता उद्या रविवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे तब्बल ३२ हजार कार्यकर्ते घरोघरी संपर्क साधणार आहे. उद्या रविवारी भाजपचे नागपूरमधून महाजनसंपर्क अभियान आहे. या अभियानाच्या माध्यमातून भाजप आपल्या प्रचाराचा श्री गणेशा करणार आहे.

जनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून भाजपचे नेते, पदाधिकारी, प्रभारी, प्रवासी कार्यकर्ते आणि स्थानिक कार्यकर्ते दहा वर्षांच्या केंद्र आणि राज्य शासनाचे विकासाचे प्रगतीपुस्तक घेवून घरोघरी जाणार आहेत. यावेळी लोकसभेच्या निवडणुकीत मतदान न करणाऱ्यांना विधानसभेत मतदान करण्याचे आवाहन केले जाणार आहे. नागरिकांच्या समस्या, अडचणींची नोंद घेतली जाणार आहे तसेच मतदार याद्यांमधील नावांची प्रत्येकाच्या घरी जावून खातरजमा केली जाणार असल्याचे भाजपचे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी सांगितले. नागपूर शहरात २१५८ बुथ आहेत. भाजपचे तेवढेच बुथ प्रमुख आहेत. ७३४ शक्ती केंद्र आणि प्रमुख आहेत. ५३०० पदाधिकारी, सहप्रभारी शक्ती प्रमुख, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य असे एकूण ३२ हजार कार्यकर्ते या अभियानात सहभागी होणार आहे.

पूर्व नागपूर आणि मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघात स्वतः केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बुथवर भेटी देणार आहेत. देवेंद्र फडणवीस आपल्या दक्षिण-पश्चिम, उत्तर नागपूरमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम, यांच्या सर्व आजी-माजी आमदार आपआपल्या मतदारसंघातील अभियानानात सहभागी होणार आहेत.लोकसभेच्या निवडणुकीत भाजपने ७५ टक्के मतदानाचा संकल्प केला होता. नितीन गडकरी यांनीसुद्धा मतदान करण्याचे आवाहन केले होते. प्रत्यक्षात मात्र ५५ टक्के मतदान झाले होते. या दरम्यान मतदार याद्यांमधील घोळ मोठ्या प्रमाणात समोर आला होता. जवळपास पावणे दोन लाख मतदारांचा सुधारित मतदान यादीत समावेश करण्यात आला आहे. लोकसभेच्या दरम्यान भाजपने १३ लाख मतदारांचा मोबाईलाचा डाटा गोळा केला असल्याचे बंटी कुकडे यांनी सांगितले. यावेळी आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास कुंभारे, धर्मपाल मेश्राम, चंदन गोस्वामी, संजय बंगाले आदी उपस्थित होते.

# हर्षवर्धन पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रवेश सोहळा ठरणार ऐतिहासिक

## सोहळ्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष;इंदापूरात गर्दीचा नवा विक्रम प्रस्थापित होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**







राज्यातील ज्येष्ठ नेते,माजी मंत्री.हर्षवर्धन पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमधील प्रवेश सोहळा सोमवारी (दि.७) सकाळी १० वाजता संपन्न होत असून,हा पक्षप्रवेश सोहळा ऐतिहासिक व इंदापूर तालुक्यातील गर्दीचा नवा विक्रम प्रस्थापित करणारा ठरणार आहे.या पक्ष प्रवेश सोहळ्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.दरम्यान,राजवर्धन पाटील यांनी रविवारी सायंकाळी सभा स्थळाची पाहणी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार.शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार्या या पक्ष प्रवेश सोहळ्यास प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार.सुप्रियाताई सुळे,माजी.उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,खासदार.अमोल कोल्हे,खासदार.धैर्यशील मोहिते पाटील,आमदार.रोहित पवार व पक्षातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न होणार आहे.या पक्ष प्रवेश सोहळ्यात महिलांची उपस्थिती लक्षणीय असणार आहे. सध्या सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाली असून,सुमारे ३० हजार पेक्षा जास्त नागरिक उपस्थित राहतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या पक्ष प्रवेश सोहळ्यामुळे इंदापूर तालुक्यात विकासाचे नवे पर्व सुरू होणार आहे.तरी या पक्ष प्रवेश सोहळ्यास सकाळी १० वाजने पूर्वी नागरिकांनी सभास्थळी उपस्थित रहावे,असे आवाहन हर्षवर्धन पाटील संपर्क कार्यालय इंदापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दैनंदिन दौंड-पुणे रेल्वे प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना दिलासा

## दौंड-हडपसर डेमू आता पुण्यापर्यंत चालणार:आ.राहुल कुल यांची माहिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**






दौंड स्थानकावरून सकाळी ६:१० वाजता सुटणारी ०१५२२ डिझेल (ऊ्मण ङजउ-ङ) रेल्वे हडपसर (मुंढवा) पर्यंतच असल्याने हजारो विद्यार्थी, चाकरमानी,कर्मचारी व महिलांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत होते,हि डेमू हडपसर ऐवजी पुणे स्टेशन पर्यंत नेण्यात यावी अशी प्रवाशांची मागणी होती.आता ०१५२२ रेल्वे ही गाडी दौंड स्टेशन वरून सकाळी ६ :०५ वाजता सुटेल याबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचेकडे दिल्ली येथे भेट घेऊन तसेच तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दौंड रेल्वे स्टेशन येथे भेट दिली त्यावेळी मागणी केली होती,तसेच याबाबत सातत्याने आमदार राहुल कुल यांनी पाठपुरावा केला होता. ०१५२२ - दौंड - हडपसर डेमू पुण्यापर्यंत नेण्याची मागणी आमदार राहुल कुल यांनी केली होती.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचेकडे दिल्ली येथे भेट घेऊन तसेच तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे दौंड पुणे रेल्वे प्रवासी संघाच्यावतीने तसेच प्रवाशांच्यावतीने आमदार राहुल कुल यांनी आभार मानले. तसेच दौंड रेल्वे स्टेशनचा समावेश पुणे रेल्वे विभागात करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल देखील रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव,तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे आमदार राहुल कुल यांनी आभार मानले.

# सोलो डान्स,ड्युट डान्स,ग्रुप डान्स शो मध्ये शिरूर तालुक्याच्या संतोषी, आरुषी,नव्या,ठरल्या सुपर डान्सर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**


पुणे येथील रॉयल आणि विरा डान्स अकॅडमी मार्फत सोलो डान्स, ड्युट डान्स, ग्रुप डान्स अश्या पद्धतीचे कॅटेगरी नुसार डान्स शो, एलप्रो सिटी स्क्वेअर मॉल पुणे येथे पार पडले. या कार्यक्रमाचे जज म्हणून लाभलेले अपेक्षा आणि प्रतीक्षा मॅडम या स्टार प्रवाह वरील महाराष्ट्राची सुपर जोडी या डान्स शो चे विजेती जोडी ठरलेली आहेत. अश्या महाराष्ट्रातील दर्जेदार डान्सर जज म्हणून लाभलेल्या कार्यक्रम मध्ये संतोषी अविनाश गाडेकर, आरुषी राम गाडेकर, नव्या तुकाराम काटकर या तिन्ही विद्यार्थिनीने ग्रुप डान्स करून तिसरा क्रमांक मिळवला आहे. शिरूर तालुक्यामध्ये डान्स या क्षेत्राचे कसलेही क्लासेस, मार्गदर्शन, वातावरण नसलेल्या या तालुक्यामध्ये संतोषी, आरुषी, नव्या सारखे दर्जेदार डान्सर या भागात दडलेले आहेत. ज्याची किंमत पुण्याला गेल्यावर समजली असे बंटी सरांनी सांगितले. पुण्याला भारी क्लासेस, दररोज डान्स प्रॅक्टिस करणारे विद्यार्थी आहेत. तरी सुध्दा शिरूर (कासार) तालुक्याच्या मुलींनी पुण्याला जाऊन तिसऱ्या क्रमांकाच्या ट्रॉफी वर आपले वर्चस्व मिळवणे ही खूप अभिमानाची बाब आहे. बंटी सर उगलमुगले यांची लहानपणाची डान्सची आवड आणि स्वप्न, त्यांनी पुण्याला जाऊन स्टेज उपलब्ध करून, त्यांच्या विद्यार्थी मार्फत साकार करताना दिसत आहे. बंटी सरांचे आणि त्यांच्या विद्यार्थीचे संपूर्ण शिरूर (कासार)तालुक्यामध्ये अभिनंदन होत आहे. शिक्षण क्षेत्रातसोबत सांस्कृतिक क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रामध्ये सुध्दा बंटी सर उगलमुगले काम करताना दिसत आहेत. विद्यार्थी सर्वगुण संपन्न असावा या विचारावर चालणारे बंटी सर प्रत्येक विद्यार्थीच्या क्वालिटी नुसार गुणानुसार मार्गदर्शन करताना दिसत आहे.

# श्रीधर जायभाये यांची वंजारी महासंघ बुलढाणा जिल्हा शिक्षक आघाडी पदी नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी शासकीय विश्रामगृह देऊळगाव राजा येथे श्री गणेशजी खाडे संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य, यांच्या उपस्थितीत सामाजिक विचारमंथांच्या बैठकी मध्ये,आतापर्यंत सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांनी श्रीधर जायभाये, विषय शिक्षक पंचायत समिती सिंदखेडराजा, यांची वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य अंतर्गत बुलढाणा जिल्हाध्यक्ष,शिक्षक आघाडी पदी नियुक्ती केली व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या,त्याबद्दल दे. राजा व सिं. राजा तालुक्यातून शिक्षक मित्र मंडळी द्वारे त्यांचे अभिनंदन होत आहे.



# मा.मंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नातून तालुक्यात ४५ कोटी ९२ लक्ष रूपये कामांचा शुभारंभ


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

माजीमंत्री सुरेश धस यांच्या माध्यमातून आष्टी मतदारसंघात विविध विकास कामांचा धुमधडाका सुरू असून, सोमवार (दि.७)रोजी तालुक्यातील बेलगांव, मच्छिंद्रनाथ गड व गंगादेवी याठिकाणी सुमारे ४५ कोटी ९२ लक्ष रूपये विकासकामांचे भूमिपूजन माजीमंत्री सुरेश धस यांच्याहस्ते होणार आहे.

आष्टी मतदारसंघात माजीमंत्री सुरेश धस यांच्या माध्यमातून शासन दरबारातून मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणला आहे.आज सोमवार (दि.७)रोजी बेलगांव येथे सकाळी ९ वा.१२ कोटी ३१ लक्ष ,वनवेवाडी,नागतळा दुपारी १२.३० वा.१२ कोटी तर दुपारी १.३० वा.मच्छिंद्रनाथ गड येथे २० कोटी ३५ लक्ष रूपये,आणि गंगादेवी येथे सायंकाळी ५ वा.१ कोटी २६ लक्ष असे एकूण ४५ कोटी ९२ लक्ष रूपायांचे वरील ठिकाणी विविध विकास कामांचे भूमिपूजन माजीमंत्री सुरेश धस यांच्या हस्ते होणार आहे.तरी वरील ठिकाणी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गावातील सरपंच, पदाधिकारी यांनी केले आहे.







# दीनदयाल विद्यालयात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे बुधवार दिनांक ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य श्री. एस.बी.गारडे सर आणि पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसर तसेच वैयक्तिक स्वच्छता या बाबत मार्गदर्शन करून प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबून दोन्ही महान नेत्यांना अभिवादन करण्यात आले. क्रिडा शिक्षक श्री.राजुसिंग राठोड यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि दिवंगत माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन तसेच संचलन श्री.नंदकुमार वायाळ सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले तसेच परिसर आणि वैयक्तिक स्वच्छता बाळगण्याबाबत विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्राध्यापिका तसेच शिक्षक - शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी सहकार्य केले.

# दिल्ली वेस बुरुजांने घेतला मोकळा श्वास

## शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या मावळ्यांची दिल्ली वेस संवर्धन मोहिम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

महाराष्ट्रातील गडकिल्ले संवर्धन आणि पुरातन वारसा जतन करण्यासाठी पुढाकार घेतलेल्या शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संस्थेच्या माध्यमातून श्रीगोंदा शहराची ऐतिहासिक व पुरातन ओळख असलेल्या दिल्ली वेशीच्या बुरुजांवर गवत व काटरी झुडपांचे वर्षानुवर्ष साम्राज्य वाढत चालले होते. याची दखल घेत नवरात्रोत्सव निमित्ताने हा वारसा संवर्धन व स्वच्छता मोहीम हाती घेऊन वारसा जतन करण्यासाठी पहिले पाऊल टाकले आहे. भव्य अशा पश्चिम बुरुजांवरील काटेरी झुडपे, गवत, वेली, काढून वेशिचा श्वास मोकळा करण्यात शिवदुर्ग मावळ्यांना यश आले. उर्वरित दुसऱ्या बुरुजाचे काम लवकरच होईल. ही वेस जतन करण्यासाठी यापुढेही वारंवार संवर्धन मोहिम राबविण्यात येणार आहेत. अशी माहिती टीम प्रमुख सागर शिंदे यांनी सांगितले. यामध्ये शिवदुर्ग शिलेदार सदस्यांनी सहभाग नोंदवला. शिवदुर्ग अध्यक्ष राजेश इंगळे, मारूती वागसकर, सागर शिंदे, अमोल बडे, गोरख कडूस, दिगंबर भुजबळ, रहिम हवालदार, सचिन भोसले,निखिल चन्ने, ईश्वर कोठारे,अक्षय ओहळ,प्रणव गलांडे,सचिन भोसले,दिगंबर भुजबळ,मारूती वागस्कर,प्रा.भरत खोमणे,नीरज पाडळे,आविष्कार इंगळे,आनंद झराड,संगिता इंगळे , वैभव माने,नितिन भोईटे ,आयुष बडे,यांनी सहभाग नोंदवला. शिवदुर्गची दिल्ली वेस संवर्धन मोहिम सुरू असताना जाणारे येणारे नागरिक थांबून विचारणा करतं होतें. पहात होते. उत्स्फूर्त दाद देत होते. शिवदुर्ग टीम लई भारी काम करत आहेत. ही वेस आपली ओळख आहे. आपल्या शहराचाइ तिहास आहे.ती जतन व्हायला हवी अशा भावनाा यावेळी जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना व्यक्त केल्या.



### शिवदुर्ग परिवार वेस जतन करणार

**श्रीगोंदा शहराची ओळख असलेली ही दिल्ली वेस खूप मोठ्या ऐतिहासिक घटनांची साक्षीदार आहे. शिवदुर्गने पानिपत शौर्य वेस म्हणून या वेशीची नव्याने ओळख निर्माण केली आहे.वेशीच्या बुरुजांना पडलेल्या भेगा काही दिवसांपासुन मोठ्या होताना दिसून आल्या आहेत. आत्ताच हा वारसा जतन नाही केला तर पुढील काळात ही वेस नामशेष होईल. आणि आपली तरूण पिढी या नामशेष होण्याचे साक्षीदार असु. म्हणूनच शिवदुर्ग परिवाराने या वेशिचे संवर्धन कार्य हाती घेतले आहे. सर्व नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहन शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.**

**–राजेश इंगळे –अध्यक्ष शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन व इतिहास संशोधक.**

## जिजामाता माध्य.शाळा व क. म.वि मध्ये शारदामातेची स्थापना



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मोर्शी । प्रतिनिधी**


येथील विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, येरला ता.मोर्शी द्वारा संचालित जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,मोर्शी येथे दि.३ऑक्टोबर २०२४ रोजी शारदामातेची स्थापना सौ.विमलाताई विकासराव ठाकरे (उपाध्यक्षा, विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला), सौ.शोभाताई सुहासराव ठाकरे(कार्यकारिणी सदस्या,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला.), यांच्या शुभहस्ते झाली.प्रमुख अतिथी श्री विकासराव ठाकरे (सचिव,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था,येरला.),सौ.शुभांगी जयंतराव सराटकर(कार्यकारिणी सदस्या,विदर्भ समाजकल्याण व बहुउद्देशीय शिक्षण संस्था, येरला.),प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई होते.याप्रसंगी सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी रांगोळी स्पर्धा व आरती सजावट स्पर्धा मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आली.या स्पर्धेनंतर प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई यांच्या अध्यक्षतेत माता पालक मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ.माधुरी मंगेशसिंह गहरवार,सौ.सुरेखा गजाननराव राऊत,सौ.रंजना निलेशराव फुके, सौ.पद्मा ज्ञानेश्वरराव भड या होत्या. माता पालक मेळाव्याचे प्रास्ताविक श्री भुजंगराव भारती सर,संचालन श्रीमती प्रेमलता विरखरे मॅडम तर आभार श्रीमती अजमिरे मॅडम यांनी मानले.या कार्यक्रमाला बहुसंख्य माता–पालक वर्ग उपस्थित होता तसेच सर्व शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी – विद्यार्थिनी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली. दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी आरोग्य मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रमुख वक्त्या समुपदेशक डॉ.सौ.प्रतिभा घाटोळ यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना निरोगी आरोग्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री सुधीरकुमार सवाई होते.अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थी – विद्यार्थिनींनी आरोग्य विषयक मार्गदर्शन आचरणात आणून स्वतःचे आरोग्य निरोगी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. उज्ज्वला ढोकणे मॅडम यांनी केले तर आभार कु.सिमा गाडगे मॅडम यांनी मानले.कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी –विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

## अनंतपाळ राज्यस्तरीय ग्रामीण मराठी कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी डॉ विजयकुमार कस्तुरे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । ज्ञानेश्वर बुधवत**

शिरूर अनंतपाळ येथे दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या ३ ऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सुप्रसिद्ध अंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त कवी,लेखक,गीतकार,गायक, विविध वाद्यवादक,कलावंत,अभिनेता, दिग्दर्शक,कथाकार, लघुचित्रपट,कथालेखक क्राईम रिपोर्टर, विविध साहित्यिक,तथा कार्यक्षेत्रातील अंतरराष्ट्रीय तथा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त डॉ विजयकुमार कस्तुरे चिखली जिल्हा बुलढाणा यांची दिनांक ०४/१०/२०२४ या रोजी श्री अनंतपाळ कवी संमेलनाच्या बैठकीत एकमताने त्यांची निवड करण्यात आली या वेळी कवी संमेलन स्वागत अध्यक्ष प्रेम कवी गोविंद श्रीमंगल म्हणाले या कवी संमेलनात महाराष्ट्रातुन जवळ पास ८० ते ९० कवी कवयित्री मोठ्या संख्येने भाग घेत आहेत तसेच या कवी संमेलनात, माझी एक कवीता,व प्रतिनिधी बाल कवीता याचे ही प्रकाशन होणार असल्याची माहिती स्वागत अध्यक्ष प्रेम कवी गोविंद श्रीमंगल,यांनी दिली ज्या कवींची या बालकवीता प्रातिनिधिक पुस्तकात कवीता दिली त्या कवींना या पुस्तकाच्या दोन प्रती,फेटा, सन्मानचिन्ह, सन्मान पत्र देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती दिली तसेच यात ११राज्यस्तरीय पुरस्कार विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यानां मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली ते पुढे म्हणाले कवीतेची आवड लहाणपणापासूनच असली पाहिजे त्यातच रंजनात्मक बालकवीतेतून साहित्यित्याची निर्मिती होते जसे काळ्या मातीत मातीत तिफण चालते या साऱ्या विविध कवीतेतुन कवीतेची गोडी मला बिलगली गेली म्हणुनच मला कवितेकडे बघण्याचा उत्तम दृष्टिकोन जोपासता आला अशा रंजनात्मक बाल कवीतेतुन साहित्याची निर्मिती झाली म्हणुन मी यावेळी प्रतिनिधीक बाल कविता काढण्याचा संकल्प केला व या पुस्तकाचे प्रकाशन या कवी संमेलनात होत असल्याचा आनंद प्रेम कवी गोविंद श्रीमंगल यांनी वेक्त केले या कवी संमेलनात नवोदित कवींना आपल्या हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे ज्या कवींना या कवी संमेलनात भाग घ्यायचा असेल अशा कवींनी खालील मोबाईल नंबरशी संपर्क साधावा मो ९१३०४८८२४५ या कवी संमेलनासाठी निवेदक म्हणून लाभलेले पुणे येथील व्यावसायिक कलाकार, गायक,निवेदक, अभिनेता, मराठी चित्रपटात लघुचित्रपटात अभिनेता म्हणून राहुल देशपांडे सोबत मी वसंतराव पुरणपोळी मध्ये सुबोध भावे यांच्या सोबत धुमस मध्ये पत्रकारांच्या भुमेकेत हिंदी, चित्रपटात पानिपत मध्ये संजय दत्त सोबत तर सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट लाडला मध्ये अनिल कपूर यांचे सोबत सहकलाकार म्हणुन भुमिका बजावले प्रमोद कुलकर्णी हे आपणास निवेदक म्हणून लाभले आहेत.हे कविसंमेलन श्री फंक्शन हॉल श्री कृष्ण मंदिर कुमार स्वामी नगर लातूर रोड शिरूर अनंतपाळ येथे होणार आहे.



**सरस्वती बहुद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगांव ता.मुखेड येथे पुरस्कार देते वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे मा.स्विय स.बालाजी पाटील खतगावकर व मा.शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर तसेच पुरस्कार विजेते, नेते, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.**



## राष्ट्रभक्तानी पस्तीस हजार फूट उंचीवर विमानात गायले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अजरामर गीत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

जयस्तुतै, श्री महामंगले हे विर सावरकरांचे अजरामर गित धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली ६१ राष्ट्रभक्तांनी चक्क ३५ हजार फुट ऊंचीवर थेट विमानात गायल्याची घटना पहिल्यांदाच घडल्यामुळे अंदमान सहलीवर गेलेल्या सर्व सावरकर भक्तांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सात दिवसाच्या अंदमान सहलीचे पहिल्यांदाच आयोजन ड. दिलीप ठाकूर व संदीप मैंद यांनी केले होते. अंदमान ते हैदराबाद या परतीच्या प्रवासात दिलीप ठाकूर यांनी जयस्तुते हे गीत सामूहिकरीत्या गाण्यासाठी पायलटची परवानगी घेतली. स्वातंत्र्यवीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर नांदेडच्या सर्व पर्यटकांनी हे गीत सामुहिकरीत्या गाण्याचा सराव केल्यामुळे विमानात कोणतीही अडचण आली नाही. विशेष म्हणजे विमानात बसलेल्या २८० प्रवाशांपैकी बहुतेकांनी नांदेडच्या पर्यटकांसमवेतच हे गीत गायले. भारत माता की जय, वंदे मातरम, स्वातंत्र वीर सावरकरांचा विजय असो या घोषणांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. टाळ्यांच्या कडकडात या अभिनव प्रयोगाचे सर्वांनी स्वागत केले. अनेकांनी आपल्या मोबाईल मध्ये या





प्रसंगाचे चित्रण केले.विमान प्रवास संपल्यानंतर हवाई सुंदरी सह अनेकांनी दिलीप ठाकूर यांच्या समवेत सेल्फी घेऊन त्यांच्या राष्ट्रभक्तीचे कौतुक केले. यापूर्वी भाऊ ट्रॅव्हल्स व माय हॉलिडेज च्या वतीने २४ वर्षात अनेक धार्मिक यात्रांचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आलेले आहे.नांदेडसह मुंबई, पुणे, सोलापूर, संभाजीनगर, परभणी, लातूर,वसमत व हैद्राबाद येथील पर्यटक अंदमान सहलीमध्ये सहभागी झाले होते. पृथ्वीवर असलेल्या सर्व दळणवळण साधनांचा उपयोग या सहलीमध्ये करण्यात आला.नांदेड हैद्राबाद नांदेड रेल्वे प्रवास,हैद्राबाद श्री विजयपुरम हैद्राबाद विमान प्रवास,श्री विजयपुरम इतर बेटांना जाता येतांना केलेला क्रुझ, स्टिमर,स्पीड बोटचा प्रवास,बारतांग ला जाता येताना केलेला रस्त्याचा वापर,समुद्रातील जीवन सृष्टी पाहण्यासाठी पाण्याखालून सब मरीन ने मारलेला फेरफटका आणि चुनखडी च्या गुहा पाहण्यासाठी जंगलात केलेली अडीच किलोमीटर ची पायपिट करण्यात आली. यामुळे जल, भूमी,आकाश या तिन्ही ठिकाणी पर्यटकांचा विहार झालेला आहे. सात दिवसाच्या कालावधीत सेल्युलर जेल, पोर्ट ब्लेअर, रॉस आयलँड, नॉर्थ बे आयलँड, बाराटांग बेट, हॅवलॉक आयलँड या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यात आल्या.जंगलात राहणाऱ्या जारवा आदिवासींना पाहता आले.वातानुकूलीत तृतीय वर्गाचा रेल्वे प्रवास, आरामदायी चार टेम्पो ट्रॅव्हल्स, तृतीय व चतुर्थ तारांकित हॉटेलात सुसज्ज रूम मध्ये सर्वांची निवास व्यवस्था करण्यात आली होती. सर्वच ठिकाणी वेळेवर रुचकर भोजन व मुबलक प्रमाणात मिनरल वॉटर दिल्यामुळे प्रत्येकाची प्रकृती चांगली राहिली.दिलीप ठाकूर यांनी वेळोवेळी घेतलेले मनोरंजक खेळ, अंताक्षरी,प्रत्येक प्रवाश्यांवर केलेले मार्मिक विनोद यामुळे प्रवासाची रंगत वाढली. संदीप मैंद,टूर मॅनेजर जयंत वाणी,विशाल मुळे,किरण मोरे यांनी सर्वांची वैयक्तिक काळजी घेतली. दहा नोव्हेंबरला गुजरात स्पेशल, पंचवीस नोव्हेंबरला दक्षिण भारत,तेरा डिसेंबरला कोस्टल कर्नाटक, एक जानेवारी २०२५ ला गंगासागर यात्रा, सतरा जानेवारी ला दुसरी अंदमान सहल,तेवीस जानेवारीला राजस्थान स्पेशल यात्रा काढण्यात येणार आहे. याशिवाय फेब्रुवारी महिन्यात अयोध्या,वाराणसी प्रयाग चा समावेश असलेली उत्तर प्रदेश टूर, मार्चमध्ये नेपाळ, एप्रिलमध्ये हिमाचल स्पेशल, मे मध्ये केरळ टुर तसेच चारोधाम यात्रा, जून व जुलै महिन्यात अमरनाथ यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

पहिल्याच अंदमान सहलीमध्ये दिलीप ठाकूर, संदीप मैंद व त्यांच्या टीमने अंत्यत नियोजनबद्ध व्यवस्था केल्याबद्दल सर्व पर्यटकांनी समाधान व्यक्त केले. ड.दिलीप ठाकूर हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या नाविन्यपुर्ण उपक्रमांच्या माध्यमातून सदैव जनसेवेत, समाजसेवेत कार्यरत असतात. या वेळेस या ध्येयवेड्या, प्रखर राष्ट्रभक्तिने औतप्रोत ठासून भरलेल्या विर सावरकर प्रेमीने अंदमान बेटावर जाऊन आपल्या देशप्रेमी साथीदारांना सोबत घेवून विर सावरकरांच्या पावन चरणी नतमस्तक झाले. विमानात एकमेकांशी न बोलणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानण्यात येत असताना चक्क वीर सावरकरांचे गीत सामूहिक रित्या गाण्याचा विक्रम पहिल्यांदाच केल्याबद्दल दिलीप ठाकूर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904